२०२४-२५ निधी वितरण
३४ - शिष्यवृत्ती/विद्यावेतन

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक:- निधिवि २०२४/प्र.क्र.३२/ एसडी-५

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२

दिनांक :- २४ फेब्रुवारी, २०२५

संदर्भ :-

१) शिक्षण संचालक, योजना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि.०५.०७.२०२४, दि.३१.१२.२०२४, दि.०२.०१.२०२५ व दि.१७.०२.२०२५ रोजीचे पत्र.

२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.निधीवि-२०२४/प्र.क्र.३२/एसडी-५, दि.०६.०८.२०२४, दि.०९.०१.२०२५ व दि.२८.०१.२०२५.

३) वित्त विभागाचे क्र.अर्थसं २०२४/प्र.क्र.८०/अर्थ-३,दि.२५.०७.२०२४ व दि.१२.०२.२०२५ चे परिपत्रक

प्रस्तावना :-

शालेय शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणा-या शैक्षणिक शिष्यवृत्ती योजनांबाबतचा सन २०२४-२५ चा मंजूर निधी बी.डी.एस प्रणालीवर उपलब्ध करुन देण्याबाबत शिक्षण संचालक (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संदर्भ क्र.१ येथील दि.०५.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली होती. त्याअनुषंगाने वित्त विभागाच्या दि.२५.०७.२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये निधी वितरणासाठी उद्दिष्टनिहाय खर्चासाठी घालून दिलेल्या मर्यादेनुसार दि.०६.०८.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये ३० टक्के च्या प्रमाणात निधी वितरीत करण्यात आला आहे. दि.०९.०१.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये ८० टक्केच्या प्रमाणात निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच दि.२८.०१.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये ९० टक्केच्या प्रमाणात निधी वितरीत करण्यात आला आहे सद्यस्थितीत ३४- शिष्यवृत्ती / विद्यावेतन या उद्दिष्टाखाली मंजूर निधीच्या १०० टक्के इतक्या प्रमाणात निधी वितरणासाठी उपलब्ध करण्यात आलेला आहे.

त्यानुषंगाने राज्यातील गुणवान विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहीत करण्याकरीता वित्त विभागाने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात एकूण मंजूर केलेल्या निधीच्या १०० टक्केच्या प्रमाणात ३४-शिष्यवृत्ती / विद्यावेतन या उद्दिष्टाखाली निधी वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

राज्यात गुणवान विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी विविध योजना कार्यन्वित आहेत. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये अर्थसंकल्पित तरतूदीमधून वित्त विभागाने वितरणासाठी उपलब्ध केल्यानुसार अर्थसंकल्पित मंजूर तरतुदीच्या १०० टक्के च्या प्रमाणात निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. खालील परिच्छेद ३ मध्ये ३४- शिष्यवृत्ती / विद्यावेतन या उद्दिष्टाखाली नमूद योजनांसाठी एकूण रु.५,३७,५४,५००/- (अक्षरी रु. पाच कोटी सदतीस लक्ष चोपन्न हजार पाचशे फक्त) इतका निधी वितरीत करण्यास व सदर निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यास शासन मान्यता देत आहे.

३. राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती संदर्भात वितरीत करावयाच्या निधीचा तपशील पुढील प्रमाणे आहे :-

(रुपये हजारात)

अ. क्र	लेखाशीर्ष	योजनेचे नाव	अर्थसंकल्पित रक्कम	मंजूर निधीच्या १०० टक्के रक्कम	वितरीत केलेली रक्कम	वितरीत करावयाची रक्कम (५-६)
१	२	३	४	५	६	७
१)	२२०२०३८९ (३४)	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०२, माध्यमिक शिक्षण १०७, शिष्यवृत्त्या (०३) शिष्यवृत्त्या (०३)(०२) प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना सहाय्य (२२०२०३८९)	४५४५०	४५४५०	४०९०५	४५४५
२)	२२०२२३१८ (३४)	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०२, माध्यमिक शिक्षण १०७, शिष्यवृत्त्या, (०२)(०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदाने (उच्च माध्यमिक शाळा) (२२०२२३१८)	३९१०९५	३९१०९५	३५१९८५.५	३९१०९.५
३)	२२०२०३४२ (३४)	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०२, माध्यमिक शिक्षण १०७, शिष्यवृत्त्या, (०१) माध्यमिक शाळांमधील शिष्यवृत्त्या (०१)(०१) ग्रामीण भागातील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिष्यवृत्ती (२२०२०३४२)	१८१००	१८१००	१६२९०	१८१०

४)	२२०२०३५१ (३४)	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०२, माध्यमिक शिक्षण १०७, शिष्यवृत्त्या, (०१)(०२) खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती, (पुर्व माध्यमिक शाळा) (२२०२०३५१)	८२५००	८२५००	७४२५०	८२५०
५)	२२०२१०६२ (३४)	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०५, भाषा विकास-१०३, संस्कृत शिक्षण (००)(००) (०१) माध्यमिक शाळांमध्ये भारत सरकारची शिष्यवृत्ती (२२०२१०६२)	४००	४००	३६०	४०
	एकुण		**५३७५४५**	**५३७५४५**	**४८३७९०.५**	**५३७५४.५**

४. वरील बाबींवर होणारा खर्च उपरोक्त नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

५. सदर निधी वितरीत करण्यासाठी आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच लेखाधिकारी (लेखा), शिक्षण संचालनालय योजना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येणाऱ्या निधीकरिता आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. याबाबतीत वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेली मार्गदर्शक तत्त्वे / शासन निर्णय / शासन परिपत्रक यामधील सूचनांचे पालन करणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०२२४१२२६२४४४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

TUSHAR VASANT MAHAJAN

Digitally signed by TUSHAR VASANT MAHAJAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT, 2.5.4.20=19c6c23f510a80926e9b7ee5db235979452f3f9e8918118634069a6cc7a22b9f, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1A39CEF3C157B9EE6A2ABE5779ACF233682613F7B9C335D6BF4877267695CECA, cn=TUSHAR VASANT MAHAJAN
Date: 2025.02.24 12:27:30 +05'30'

(तुषार महाजन)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.विधानसभा अध्यक्ष/ मा. विधानपरिषद सभापती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय , मुंबई

४. मा.विधानसभा/विधान परिषद सदस्य, विधान भवन (मुंबई सर्व).
५. मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, सर्व.
६. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक.
७. प्रधान सचिव, (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. शिक्षण संचालक (प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१०.शिक्षण संचालक (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
११.सहाय्यक संचालक (लेखा), माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण संचालनालय, पुणे.
१२.सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१३.लेखाधिकारी (लेखा), शिक्षण संचालनालय योजना, महाराष्ट्र राज्य, पुणे
१४.वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५.अवर सचिव (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६.निवड नस्ती (एसडी-५)